फोटो आहे

वाङ्मय चर्चा मंडळाचा पुरस्कार

प्रकाश क्षीरसागर यांना जाहीर

ताळगाव, दि. ७ : येथील पत्रकार व साहित्यिक प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या माणसांची खैर नाही या ललित लेखसंग्रहाला बेळगाव येथील वाङ्मय चर्चा मंडळातर्फे देण्यात येणारा कृ. ना. हुंदिगोळ स्मृती साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सोमवार ८ एप्रिल रोजी त्यांना हा पुरस्कार वाङ्मय मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

श्री. क्षीरसागर यांच्या माणसांची खैर नाही या ललित लेखसंग्रहाला यापूर्वी अंकुर साहित्य संघ अकोला या संस्थेचा गोविंद क्षीरसागर स्मृती पुरस्कार तसेच गोमंतक मराठी साहित्य परिषदेचा साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांचा सद्‌गुरू सीताराम महाराज चरित्रामृत हा ओवीबद्ध ग्रंथ प्रकाशित झाला असून, त्यांचे गर्भावल्या संध्याकाळी व मातीचे डोहाळे (माती, पाऊस आणि सखी) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. मातीचे डोहाळे या कवितासंग्रहाला अंकुर साहित्य संघ अकोले या संस्थेचा कवी बी पुरस्कार, अंकुर साहित्य संघ कुऱ्हा काकोडा साहित्य संमेलनाचा अभिव्यक्ती पुरस्कार, वंदना प्रकाशन मुंबईचा आशीर्वाद पुरस्कार मिळाला आहे. श्री. क्षीरसागर यांना सोलापूर येथील वृत्तपत्रलेखक संघटनेचा भालचंद्र वेणेगुरकर स्मृती पुरस्कारही प्राप्त झाला आहे. गोवा आणि महाराष्ट्रातील दिवाळी अंकातून त्यांचे कविता व कथालेखन सुरू असते. त्यांच्या विज्ञानरंजन कथांना गोमंतक मराठी अकादमी आणि मराठी विज्ञान परिषद गोवा शाखा यांची पारितोषिके मिळाली आहे. संवाद नाशिक या संस्थेचा तसेच महाराष्ट्रातील आरती मासिकाचा काव्यलेखन पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

-०-०-०-०-०-०-०-०-०-०